"Education Through Self-Help is Our Motto" - Karmveer
Rayat Shikshan Sanstha's
# ARTS & COMMERCE COLLEGE, MADHA
Dist. Solapur (MH) 413209
Affiliated to Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University
• Principal •
Dr. Suresh Dhere M.Com., M.Phil., Ph.D.
Padmabhushan Dr. Karmveer Bhaurao Patil, D. Litt
Estd - 1970
• Jr.College Index No. 24.04.001
• ☎ Principal : 9049807281
Office : 9763929899
Email : accmadha@yahoo.com Web : www.accmadha.com NAAC Reaccredited : 'A+' CGPA : 3.26

Ref.No.: By hand /2021-22 Date : 02/08/2021

## महाविद्यालय विकास समिती सभेची सुचना

प्रति

--------------------------

--------------------------

--------------------------

महोदय,

महाविद्यालय विकास समितीच्या सभासदांची सन २०२१-२२ मधील सभा सोमवार दि. १०/०८/२०२१ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता मा. संजीवकुमार पाटील साहेब अध्यक्ष महाविद्यालय विकास समिती यांच्या अध्यक्षतेखाली मा. प्राचार्यांच्या केबीनमध्ये आयोजित केलेली आहे. तरी सभेस उपस्थित रहावे, ही विनंती.

**सभेपुढील विषय**

१) मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूरी देणे.
२) ए.कॉम सुरू करण्यासाठी प्रस्ताव तयार करणे संदर्भात चर्चा करणे.
३) कनिष्ठ महाविद्यालय विनाअनुदानित विज्ञान विभाग मानधन वाढीबाबत चर्चा करणे.
४) कनिष्ठ महाविद्यालय अनुदानित विभाग तासीका तत्वावरील सेवकांना मानधन देणेबाबत चर्चा करणे.
५) जुनी इमारत तहसील कार्यालयास भाडेने देणेबाबत चर्चा करणे.
६) शेक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील वरिष्ठ विभागाकडील संस्थेने नेमलेल्या तासिका तत्वावरील सेवकांची मंजूरी घेणे.
७) नॅकसाठी झालेल्या खर्चास मान्यता घेणे.
८) Feedback आणि नवीन शैक्षणिक धोरणास अनुसरून विविध कोर्सेस संदर्भात चर्चा करणे.
९) मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणा-या ऐनवेळच्या विषयांवर चर्चा करणे.

कळावे,

आपला विश्वासू,

प्राचार्य,तथा सचिव,
महाविद्यालय विकास समिती,
कला व वाणिज्य महाविद्यालय,
माढा.जि.सोलापूर

कला व वाणिज्य महाविद्यालय माढा, जि. सोलापूर

रयत शिक्षण संस्थेचे, कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा, येथे मा. प्राचार्य यांच्या केबिनमध्ये आज सोमवार दि: 10/08/2021 रोजी सकाळी 11.00 वा. मा. संजीवकुमार पाटील साहेब यांच्या अध्यक्षतेखाली महाविद्यालय समितीची बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | उपस्थित सदस्यांचे नाव | पदनाम | सही. |
|---|---|---|---|
| 1) | मा. संजीवकुमार पाटील | अध्यक्ष | |
| 2) | मा. ॲड. धनाजीराव साठे | सदस्य | |
| 3) | मा. प्रा. अशोक कदम | सदस्य | |
| 4) | मा. प्रा. डॉ. प्रेमचंद गायकवाड | सदस्य | |
| 5) | मा. प्रा. अशोक लोंढे | सदस्य | |
| 6) | मा. प्रा. डॉ. संगीता पैकेकरी | सदस्य | |
| 7) | मा. श्री. मारुती रणदिवे | सदस्य | |
| 8) | मा. प्रा. डॉ. संतोष राजगुरु | IQAC समन्वयक | |
| 9) | मा. प्राचार्य, डॉ. सुरेश ढेरे | सचिव | |

महाविद्यालय विकास समिती

सभेचा इतिवृत्तांत

(1)

कला व वाणिज्य महाविद्यालय माढा, जि. सोलापूर

दि:- 18 ऑगस्ट 2021

सन 2021-22 मधील महाविद्यालय विकास समितीची पहिली सभा सोमवार दिनांक 10 ऑगस्ट 2021 रोजी सकाळी 11.00 वा. मा. संजयकुमार पाटील साहेब यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेली होती. सभेच्या नियोजीत वेळेप्रमाणे सभेचे कामकाज सुरू झाले व सदर बैठकीत खालील विषयांवर चर्चा होऊन सर्व विषयांवर मंजूरी देण्यात आली.

विषय क्र.1 - मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

ठराव :- मागील सभा दिनांक 23/02/2021 रोजी झालेली होती सदर सभेचे इतिवृत्तांत प्रा. अशोक कदम यांनी वाचन केले व त्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

सूचक :- प्रा. डॉ. गायकवाड पी.जी.
अनुमोदक :- प्रा. अशोक लोंढे.

विषय क्र.2 :- M.com सुरू करण्यासाठी प्रस्ताव तयार करणे संदर्भात चर्चा करणे.

ठराव क्र-2 :-

महाविद्यालयातील बी.कॉमच्या शाखेची वाढती विद्यार्थी संख्या व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची गरज विचारात घेऊन कॉमर्सचे पदवीत्तर वर्ग आपल्या महाविद्यालयात सुरू करणे गरजेचे होते. त्यास अनुसरून शैक्षणिक वर्ष 2022-23 पासून कॉमर्स विभागाकडे पदवीत्तर वर्ग सुरू करण्यासंदर्भात सविस्तर चर्चा झाली. मा. अध्यक्ष यांनी सुचविल्याप्रमाणे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचेकडील विहित नमुन्यातील मान्यता प्रस्ताव तयार करून मान्यता घेणेसाठी प्रस्ताव विद्यापीठाकडे पाठविण्याचे सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

सूचक :- प्रा. अशोक कदम
अनुमोदक :- प्रा. डॉ. संगीता पैकेकरी

विषय क्र:-3. कनिष्ठ महाविद्यालय विनाअनुदानित विज्ञान विभाग मानधन वाढीबाबत चर्चा करणे.

ठराव क्र:-3.

महाविद्यालयाच्या ज्युनिअर विभागाकडे विज्ञान शाखा विनाअनुदानित तत्वावर सुरू आहे. त्या विभागाकडे काम करणाऱ्या सेवकांकडून मानधन वाढीची मागणी सातत्याने होत होती. महाविद्यालयातील विज्ञान

कला व वाणिज्य महाविद्यालय माढा, जि. सोलापूर



शाखेची वाढती विद्यार्थी संख्या विचारात घेऊन मानधन वाढीबाबत सविस्तर चर्चा झाली. सदर चर्चेमध्ये मा. संजीवकुमार पाटील साहेब यांच्या सुचनेप्रमाणे शैक्षणिक वर्ष सन २०२१-२२ पासून शैक्षणिक वर्ष 2020-21 च्या एकूण मानधनामध्ये प्रत्येकी 10 टक्के वाढ देण्याबाबत चर्चा झाली. सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

सूचक :- प्रा. अशोक कदम
अनुमोदक :- प्रा. डॉ. प्रेमचंद गायकवाड

विषय क्र. ४ :- कनिष्ठ महाविद्यालय अनुदानित विभाग तासिका तत्वावरील सेवकांना मानधन देणेबाबत चर्चा करणे.

ठराव क्र. ४ :-

महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागाकडे राज्यशास्त्र विषयाचे सेवक सेवानिवृत्त झालेले व इतिहास विषयाचे सेवकांची बदली झाल्याने दोन्ही विषयाच्या अध्यापनाचे काम पूर्ण करून घेणेसाठी सविस्तर चर्चा करण्यात आली. महाविद्यालयामध्ये कोरोना कालावधीत नविन CHB नेमणूक झालेली नसल्याने पूर्वी या शाखेकडे काम करित असलेले श्री. भोसेकर महेश एस. यांना या दोन विषयाचा (CHB) कार्यभार देऊन त्यांना 5000/- रुपये मानधन देण्याबाबत चर्चा झाली आणि तो ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सूचक :- श्री. मारुती रणदिवे
अनुमोदक :- प्रा. अशोक लोंढे

विषय क्र. 5 :- जुनी इमारत तहसिल कार्यालयास भाडेने देणेबाबत चर्चा करणे.

ठराव क्र. 5 :-

वरीष्ठ महाविद्यालय शैक्षणिक वर्ष 2021-22 (जाने 2021) मध्ये सोलापूर रोडकडील नवीन इमारतीमध्ये स्थलांतरीत झाले. त्यामुळे गावातील जुनी इमारत रिकामी झाली शिवाय तहसिल कार्यालयाचे नवीन बांधकाम पूर्ण होईपर्यंत (साधारणतः ३ वर्षे) मा. तहसिलदार साहेब यांचेकडून जुनी इमारत भाड्याने देणेविषयी प्रस्ताव महाविद्यालयाकडे प्राप्त झाला. शिवाय माढा नगरीतील सर्व ग्रामस्थांची जुनी इमारत भाड्याने मिळणेविषयी विनंती होती. याविषयावर सविस्तर चर्चा झाली. सदर चर्चेअंती जुनी इमारत रयत शिक्षण संस्थेचे मा. सचिव साहेब यांच्या मार्गदर्शनानुसार तहसिल कार्यालयास भाड्याने देण्याचे सर्वानुमते

विषय क्र ८ :-

Feedback आणि नविन शैक्षणिक धोरणास अनुसरून विविध कोर्सेस संदर्भात चर्चा करणे.

ठराव क्र. ८ :-

केंद्र सरकारने मांडलेल्या नविन शैक्षणिक धोरणास अनुसरुन या विषयावर चर्चा झाली. ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी नविन शैक्षणिक धोरणाचा विचार करुन विविध कौशल्य आधारित कोर्सेस (Skill Based Education) सुरु करण्यासाठी सविस्तर चर्चा झाली व भविष्यात असे कोर्सेस महाविद्यालयाने सुरु करावेत असे सर्वानुमते ठरले. या शिवाय महाविद्यालयाच्या मुल्यमापनासाठी समाजातील विविध घटकांकडून Feedback घेऊन त्यामध्ये सुधारणा करण्याचे व सुचनाचे पालन करण्याचे सर्वानुमते मान्य करण्यात आले.

सूचक :- प्रा. डॉ. संतोष राजगुरु

अनुमोदक :- प्रा. अशोक लोंढे

विषय क्र ९ :-

मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या ऐनवेळच्या विषयांवर चर्चा करणे.

महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन मा. संजिवकुमार पाटील साहेब यांच्या परवानगीने येणाऱ्या विषयांवर सविस्तर चर्चा झाली.

ठराव क्र ९ (अ) :-

महाविद्यालयाचे खेळाचे ग्राऊंड (मैदान) समपातळीत करणे आवश्यक होते. या विषयावर मा. अध्यक्षांच्या परवानगीने सविस्तर चर्चा करण्यात आली. क्रीडांगण समपातळीत करणेसाठी येणारा खर्च भागविण्यासाठी जिल्हा क्रीडा विभागाकडील विहीत नमुन्यातील प्रस्ताव तयार करुन महाविद्यालयाचे क्रीडांगण समपातळीत तयार करण्यासाठी क्रीडांगण विकास अनुदान योजना अंतर्गत मा. जिल्हा क्रीडाधिकारी, सोलापूर यांचेकडे प्रस्ताव पाठवून क्रीडांगण समपातळीत करण्याचे सर्वानुमते ठरले, हा ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र ५ वा :-

महाविद्यालयास उपलब्ध असणाऱ्या जागेमधून क्रीडांगणासाठी जागा राखून ठेवणे संदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. महाविद्यालयातील क्रीडांगणासाठी जागा राखीव ठेवणे संदर्भात चर्चा झाली असता महाविद्यालयाच्या पूर्वेकडील पाच एकर जागा क्रीडांगणासाठी राखून ठेवण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. सदर ठरावास सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सेक्रेटरी　　चेअरमन
महाविद्यालय विकास समिती
आर्टस् ॲन्ड कॉमर्स कॉलेज
माढा, जि. सोलापूर.

"Education Through Self-Help is Our Motto" - Karmveer
Rayat Shikshan Sanstha's
# ARTS & COMMERCE COLLEGE, MADHA
Dist. Solapur (MH) 413209
Affiliated to Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University
Estd - 1970
• Jr.College Index No. 24.04.001
• ☎ Principal : 9049807281
Office : 9763929899
Padmabhushan Dr. Karmveer Bhaurao Patil, D. Litt
• Principal •
Dr. Suresh Dhere M.Com., M.Phil., Ph.D.
Email : accmadha@yahoo.com
Web : www.accmadha.com
NAAC Reaccredited : 'A+' CGPA : 3.26

Ref.No.:

Date : १०/०४/२०२२

## महाविद्यालय विकास समिती सभेची सुचना

प्रति

-----------------------

-----------------------

-----------------------

महोदय,

महाविद्यालय विकास समितीच्या सभासदांची सन २०२१-२२ मधील सभा सोमवार दि. ११/०४/२०२२ रोजी सकाळी ठीक ११.३० वाजता मा. संजीवकुमार पाटील साहेब अध्यक्ष महाविद्यालय विकास समिती यांच्या अध्यक्षतेखाली मा. प्राचार्यांच्या केबीनमध्ये आयोजित केलेली आहे. तरी सभेस उपस्थित रहावे, ही विनंती.

**सभेपुढील विषय**

१) मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूरी देणे.
२) लाईट फिटींग करणेस परवानगी बाबत.
३) विविध मार्गदर्शन केंद्रे बांधकामाच्या प्लॅन इस्टिमेटला मंजूरी घेणे.
४) शेततळे दुरूस्तीस मान्यता देणे.
५) कौशल्य विकासावर आधरित विविध कोर्सेस संदर्भात चर्चा करणे.
६) स्वावलंबी संजीवक शेती प्रकल्प राबविणेसाठी मंजूरी देणे.
७) मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणा-या ऐनवेळच्या विषयांवर चर्चा करणे.

कळावे,

आपला विश्वासू,

प्राचार्य,तथा सचिव,
महाविद्यालय विकास समिती,
कला व वाणिज्य महाविद्यालय,
माढा.जि.सोलापूर

कला व वाणिज्य महाविद्यालय * माढा, जि. सोलापूर *

Estd - 1970
ge Index No.
1
al : 9049807281
ce : 9763929899
CGPA : 3.26
07/2022

महाविद्यालय विकास समितीची शैक्षणिक वर्ष 2021-22 मधील तिसरी सभा दिनांक 11/04/2022 रोजी सकाळी 11:30 वा मा. संजीवकुमार पाटील साहेब यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | उपस्थित सदस्याचे नाव | पदनाम | सही |
|---|---|---|---|
| 1 | मा. संजीवकुमार पाटील | अध्यक्ष | [signature] |
| 2. | मा. ॲड. धनाजीराव साठे | सदस्य | [signature] |
| 3. | मा. प्रा. अशोक कदम | सदस्य | |
| 4. | मा. प्रा. अशोक लोंढे | सदस्य | [signature] |
| 5. | मा. प्रा. डॉ. प्रेमचंद गायकवाड | सदस्य | [signature] |
| 6. | मा. प्रा. डॉ. संगीता पैकेकरी | सदस्य | [signature] |
| 7. | मा. श्री. मारुती रणदिवे | सदस्य | [signature] |
| 8. | मा. प्रा. डॉ. संतोष रजपूत | IQAC समन्वयक | [signature] |
| 9. | मा. प्राचार्य डॉ. सुरेश ढेरे | सचिव | [signature] |

सभेचा इतिवृत्तांत

(1)

दि. ११/०४/२०२२

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील महाविद्यालय विकास समितीची तिसरी सभा दिनांक ११ एप्रिल २०२२, वार सोमवार, सकाळी ११.३० वा. मा. संजीवकुमार पाटील साहेब यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेली होती.

नियोजित वेळेप्रमाणे सभेचे कामकाज सुरू झाले व सदर बैठकीत खालील विषयावर चर्चा होऊन मंजूरी देण्यात आली.

विषय क्र.1 :- मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

ठराव क्र.1 :-

मागील सभा दिनांक २४/११/२०२१ रोजी झालेली होती. सदर सभेचे इतिवृत्तांत प्रा. अशोक कदम यांनी वाचन केले व त्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

सूचक :- प्रा. प्रेमचंद गायकवाड
अनुमोदक :- प्रा. अशोक कोंडे

विषय क्र.2 :- नवीन इमारतीस लाईट फिटींग करणेसाठी परवानगी बाबत.

ठराव क्र.2 :-

नवीन आठ वर्गखोल्याचे बांधकाम पूर्णत्वास येत आहे हे विचारात घेऊन महाविद्यालय विकास समितीच्या पुढे लाईट फिटींग चा मुद्दा चर्चेस मांडला गेला. त्यावर सविस्तर चर्चा होऊन बांधकाम पूर्ण होताच लाईट फिटींग करून घेण्याचे सर्वानुमते मंजूर झाले.

सूचक :- प्रा. अशोक कोंडे
अनुमोदक :- प्रा. डॉ. संतोष राजगुरू

विषय क्र.3 :- विविध मार्गदर्शन केंद्र बांधकामाच्या प्लॅन इस्टिमेटला मंजूरी घेणे.

ठराव क्र.3 :-

महाविद्यालयाच्या नवीन आठ वर्गखोल्यांच्या बांधकामा-नंतर कौशल्य आधारित शिक्षण देण्यासाठी कौशल्य विकास केंद्र, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, स्वतंत्र संगणक कक्ष असे कौशल्य विकास शासन कार्याच्या प्रवाहामध्ये बांधणे आवश्यक आहे.

(२)

कला व वाणिज्य महाविद्यालय माढा, जि. सोलापूर

हे बांधकाम करुन घेण्यासाठी विविध नामांकित कंपनीच्या CSR कडून रक्कम / निधी मिळविण्यासाठी प्रस्ताव पाठविणे क्रमप्राप्त आहे. त्यासाठी सदर कौशल्य दालनाचे प्लॅन व इस्टिमेट करुन घेणे आवश्यक आहे. याविषयी ठराव मांडण्यात आला. कौशल्य विकास दालनासाठी प्लॅन व इस्टिमेट तयार करुन घेण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सूचक :- प्रा. अशोक लोंढे

अनुमोदक :- प्रा. डॉ. प्रेमचंद गायकवाड

विषय क्र ४ :- शेततळे दुरुस्तीस मान्यता देणे.

ठराव क्र ४ :-

महाविद्यालयाच्या मालकीत सोलापूर रोडलगत शेततळे बांधलेले आहे. सदर शेततळे लिकेज झाल्याने सर्व पाणीसाठा नाहीसा झाला. पाणीसाठा क्षमता ठेवण्यासाठी शेततळ्यातील कागद दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरुन या विषयावर सविस्तर चर्चा झाली व हे शेततळे ~~कर~~ दुरुस्ती करुन घेण्याचे सर्वानुमते ठरले.

सूचक :- प्रा. अशोक लोंढे

अनुमोदक :- प्रा. अशोक कदम

विषय क्र 5 :- कौशल्य विकासाचे कोर्सेस चालू करणे.

ठराव क्र 5 :-

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना बदलत्या काळानुसार पारंपारिक शिक्षणाबरोबरच कौशल्य आधारीत शिक्षण देणे गरजेचे आहे. असे विविध कोर्सेस सुरु करणे महाविद्यालयाच्या विचाराधिन होते. तथापि हे कोर्सेस सुरु करणे आर्थिकदृष्ट्या अडचणीचे असल्याने काही इतर संस्थांच्या माध्यमातून विविध कोर्सेस चालु करण्यावर चर्चा करण्यात आली. कौशल्य कोर्सेस सुरु करण्यासाठी काही इतर संस्थाबरोबर चर्चा करुन त्यांचेशी करार करुन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या गरजा ओळखून तसे कोर्सेस महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष 2022-23 पासून कौशल्य आधारीत कोर्सेस सुरु करण्याचे सर्वानुमते ठरले.

सूचक :- प्रा. डॉ. संतोष राजगुरु

अनुमोदक :- प्रा. डॉ. संगीता पैकेकरी

**विषय क्र. ६ :-**
स्वावलंबी कृषी सेंद्रिय शेती प्रकल्प राबविण्यासाठी मंजुरी देणे.

**ठराव क्र ६ :-**
महाविद्यालयाकडे पडीक ३८ एकर जमीन उपलब्ध आहे. महाविद्यालय हे दुष्काळी पट्ट्यात असल्याने या जमिनीवर बागायती पिके घेता येत नाहीत. MKCL या संस्थेच्या माध्यमातून स्वावलंबी कृषी सेंद्रिय शेती प्रकल्प राबविण्यासंदर्भात सातत्याने विचारणा होत होती. शिवाय कोरडवाहू शेती व सेंद्रिय शेती हे काळाच्या गरजेनुसार नाविन्यपूर्ण उपक्रम आहेत. हा प्रकल्प सुरू करण्यासाठी महाविद्यालय विकास समिती मध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली. महाविद्यालय इमारती पाठीमागील अडीच एकर कोरडवाहू जमिनीमध्ये MKCL कृषी स्वावलंबी सेंद्रिय प्रकल्प MKCL यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाने राबवायचे असे सर्वानुमते ठरले. तसा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सूचक :- प्रा. अशोक कदम
अनुमोदक :- प्रा. डॉ. प्रेमचंद गायकवाड

**विषय क्र ७ :-** मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या ऐनवेळच्या विषयांवर चर्चा करणे.

**ठराव क्र ७ :-** महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन मा. संजीवकुमार पाटील साहेब यांच्या परवानगीने येणाऱ्या विषयांवर सविस्तर चर्चा झाली व ते सर्व ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

(कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा, जि. सोलापूर — stamp)

सेक्रेटरी — चेअरमन
महाविद्यालय विकास समिती
आर्टस् अँन्ड कॉमर्स कॉलेज
माढा, जि. सोलापूर.